नायब तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्याची पदस्थापना बदलण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०२४/प्र.क्र. ४५/आस्था-९
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १७ नोव्हेंबर, २०२६.

वाचा:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२) महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.१६७/आस्था-९, दि.२७.१०.२०२५

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) मधील तरतुदीनुसार श्री.मनोज श्रोत्री, व्यवस्थापक तथा नायब तहसीलदार, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांची प्रशासकीय कारणास्तव, सार्वजनिक सेवेच्या हितार्थ नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय चंदगड, जि.कोल्हापूर या रिक्त पदावर पदस्थापना करण्यात आलेली होती.

२. उपरोक्त पदस्थापनेत प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात येत असून महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) मधील तरतुदीनुसार श्री.मनोज श्रोत्री, नायब तहसीलदार यांची पदस्थापना आता नायब तहसीलदार (महसूल), सांगोला, जि.सोलापूर या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

३. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून, उपरोक्त अधिका-याने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. संबंधित अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी शासनास त्वरित कळवावे.

४. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने सदर अधिका-याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिका-याच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

५. उपरोक्त आदेश सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत असल्याने पदस्थापनेच्या ठिकाणी परिवीक्षाधीन तहसीलदार वा अन्य अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त यांच्या स्तरावरुन तात्पुरत्या व्यवस्थेने पदस्थापना दिलेली असल्यास अशा अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त यांनी अन्य रिक्त पदावर पदस्थापना द्यावी.

६. सदर आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ही गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयत्तेर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतुदीनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापुर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. या पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास, त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८. उपरोक्त पदस्थापना मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.१३४९/२०२५ मध्ये दि.२५.०८.२०२६ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा .उच्च न्यायालय ,मुंबई येथे शासनाच्या वतीने दाखल करावयाच्या याचिकेमध्ये होणा-या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१११७१८३४०१२५४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

VINAYAK JAKHALEKAR

Digitally signed by VINAYAK JAKHALEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=4A106D8AE9DC6F9C21243429B8A21E6762994D1EC1F8E4DB5EFA4D4EB46F5991, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D6A60D038156E6E790DF15F9D2E7618F71774B3A755DA77C0BDE0FC621C1435, cn=VINAYAK JAKHALEKAR
Date: 2026.11.17 18:35:06 +05'30'

(वि. श. जाखलेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, पुणे विभाग.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२
७. संबंधित जिल्हाधिकारी
८. प्रधान महालेखापाल, (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता) मुंबई
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१०. अवर सचिव, कार्यासन आस्था-९अ, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. संबंधित अधिकारी (विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्यामार्फत)
१२. निवडनस्ती, कार्यासन आस्था-९, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.